वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि.२८ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# नेकनुरमध्ये दोन गटात महाराजकीय तुफान राडा

## हातात लाठ्या-काठ्या घेवून दोन्ही गट समोरासमोर

### अजुन तर निवडणूक घोषीत ही झाली नाही अन् पुढाऱ्यांनी तंटा करायला सुरूवात केली



Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

नेकनुर, (दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील नेकनुर मध्ये शनिवारी दुपारी दोन गटा मध्ये तुफान हाणामारी झाल्याचे घटना घडली आहे. या घटनांमध्ये नेकनूर जिल्हा परिषद चे माजी सदस्य भारत काळे, माजी सरपंच दादाराव काळे, रवी काळे, संतोष शिंदे हे जखमी असून त्यांचेवर बीड येथे रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहे.



### माजी जि.प.सदस्य, माजी सरपंचसहा दोघे जण जखमी

सविस्तर माहिती अशी की नेकनूर मध्ये काल दिनांक २७ रोजी शनिवारी दुपारी नेकनूर बस स्टँड समोर दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली होती. या घटनाची माहिती नेकनूर पोलिसांना मिळतात पोलीस तत्काळ घटनास्थळ दाखल झाल्यामुळे मोठा अनर्थ टळला जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे आधी गटातटातुन वाद उफाळून येत असल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा वर प्रश्न निर्माण होत आहे .वाद एक गटाने दुसऱ्या गटातील व्यक्तीला मारहाण केल्यानंत हि वाद उफाळून आल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे नेकनूर मध्ये काही तास तणाव निर्माण झाला होता. तर यावेळी पोलिसांनी वेळेवर येऊन परिस्थिती वर कंट्रोल केले. आणि मोठा अनर्थ टळला तर या प्रकरणी नेकनुर पोलीस स्टेशन मध्ये शनिवारी रात्री उशीर पर्यंत घटनाची नोंद झालेली नव्हती.

**टेंडर का भरले म्हणून तिघा जणांना मारहाण**

शुक्रवारी रोजी नेकनूर ग्रामपंचायत समोर केतन रोकडे बसले होते तर

पान २ वर

# प्रभाग क्रं. १६च्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी

## सत्कारांच्या भानगडीत न पडता थेट प्रभागात केली विकास कामांना सुरुवात

### फारूक पटेल यांच्या जोडीला जमिल भाईंची जोडी म्हणजे प्रभागात येणार विकासाचीच गंगा



**निकाल लागला आणि स्वच्छतेसह नाली बांधकामाला दणक्यात सुरूवात**

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर परिषदेच्या निवडणूकीचा निकाल २१ डिसेंबरला लागला आणि प्रभाग क्रं. १६ मधून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार फारूक पटेल आणि जमील भाई यांनी दणदणीत विजय प्राप्त केला. इतर प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवक अजुन सत्कारामध्येच मग्न असून मात्र प्रभाग क्रं. १६ मधील दोन्ही नगरसेवक याला अपवाद ठरले. २१ ला निकाल लागला आणि २२ डिसेंबरला थेट जमीलभाई यांनी कामाला प्रभागात सुरूवात केली. फारूक पटेल यांची तगडी साथ जमिलभाईंना मिळाली आणि दोघांनीही दणक्यात प्रभागात स्वच्छता मोहिम हाती घेतली. स्वच्छताच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी नाल्या तुटल्या होत्या त्या थेट बांधायलाच सुरूवात केली. या प्रभागात फारूक पटेल यांनी अत्यंत दर्जेदार आणि टिकावू कामे मोठ्या प्रमाणात केली आहेत. प्रभागात असा एकही रस्ता नाही जिथे सिमेंट रस्ता नाही. पण मागील तीन वर्ष पालिकेवर प्रशासक राज असल्याने काही प्रमाणात कामे ठप्प झाले होते. स्वच्छतेचे मात्र तीनतेराच वाजले होते. ८-८ दिवस स्वच्छता होत नव्हती. निवडणूक लागली, प्रभागातील मतदारांनी फारूक पटेल आणि जमीलभाई यांना भरभरून मतदान केले आणि नगरसेवक केले. या मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आता या दोन्ही



नगरसेवकांनी ठरविले आहे. जमिलभाई यापुर्वीही या प्रभागाचे नगरसेवक होते. पहाटे उठून ते सर्व प्रभागात फेरफटका मरायचे ज्या ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे, तुंबलेल्या नाल्या दिसायच्या की जमिलभाई पटकन स्वच्छता निरिक्षकांना संपर्क करून ही कामे करून घ्यायचे. असा एक काम करणारा अभ्यासू नगरसेवक फारूक पटेल यांना मिळाल्याने फारूक पटेल यांना आता स्वच्छतेच्या कामांकडे जास्त लक्ष देण्याची गरज राहिली नाही. आता

▶▶ पान २ वर

# राजा हो श्रेय कसले घेता हो,

## विजय फक्त समाज एकजुटीचा

### तुमचा करिश्मा एवढाच चालला असता तर पलीकडच्या बीडातून ही मते मिळायला पाहिजे होती

### तेरा फेऱ्या पैकी अर्ध्या फेऱ्या झाल्या नंतर मुस्लिम बहुल भागातून भरघोस मतदान मिळाल्या मुळे प्रेमलता पारवे यांचा विजय सुकर

### एक ते सहा फेऱ्या म्हणजे सुरवातीच्या बारा प्रभागात श्रेय घेणाऱ्यांचा करिश्मा का चालला नाही





बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिका निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले. वर्षानुवर्ष बीड नगर पालिकेवर एक हाती सत्ता असलेले क्षीरसागर कुटुंब यंदा नगरपालिकेच्या सत्ते पासून वंचित राहिले त्याचीअनेक कारणे आहेत योग्य वेळी योग्य निर्णय न घेणे अती आत्मविश्वास ,लोकांना पर्यायच नाही ते आपल्यालाच मतदान करतील असे अनेक गैर समज मात्र जनतेच्या मनात वेगळेच अनेक वर्षापासून रखडलेला विकास ,विकासापासून कोसो दूर असलेला बीड शहर आणि विशेष म्हणजे या निवडणुकीत निर्णायक भूमिका पार पाडणारा पेठ

▶▶ पान २ वर

### सर्वसामान्य नागरिक,गोरगरीब जनतेच्या एकजुटी मुळे ही अशक्य गोष्ट शक्य झाली

# नेकनूरजवळ अपघात एक ठार, एक गंभीर जखमी



नेकनूर, (दिव्य न्युज):- नेकनूर-केज मार्गावर नेकनूरपासून जवळ असलेल्या सावंतवाडी फाट्याजवळ रविवारी (दि.२८) रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास एसटी बस आणि दुचाकी यांच्यात समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वार किशोर निर्मळ (रा. नेकनूर) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा सोबत असलेला एक जण गंभीर जखमी झाला आहे. अपघातात एसटी बस क्रमांक एम.एच. २० बी.एल. ४०५२ आणि दुचाकी क्रमांक एम.एच. ४४ ए.डी. ३६६६ यांचा समावेश आहे.

▶▶ पान २ वर

# सुभाष हुंबरे यांच्यावर

## प्राणघातलक हल्ला

### रिव्हॉल्वरच्या मुठीने मारले, हल्लेखोराने दोन रिव्हॉल्वर आणल्या होत्या

बीड, (दिव्य न्युज):- येथील तुळजाई ट्रेडींग कंपनीचे सुभाष हुंबरे यांच्यावर ६ ते ७ जणांच्या टोळक्याने हल्ला केल्याची घटना शनिवारी रात्री ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास शिवाजी नगर पोलीस ठाणे हद्दीत घडली. यावेळी हल्लेखोरांनी हुंबरे यांना रिव्हॉल्वरच्या मुठीने मारुन जखमी केले आहे. त्यांच्या कपाळाला दुखापत झाली आहे. दरम्यान हल्लेखोरांकडील रिव्हॉल्वर हिसकावून घेत हंबरे यांनी ते शिवाजी नगर पोलीस ठाण्यात स्वतः येऊन जमा केले आहे. हल्लेखोरांकडे दोन रिव्हॉल्वर होत्या त्यापैकी एक घटनास्थळी पडली असून दुसरी आपण पोलिसात जमा केल्याचे हंबरे यांनी सांगितले.

बीड शहरातील शिवाजी नगर पोलीस ठाणे हद्दीत सुभाष हुंबरे यांचे तुळजाई ट्रेडींग कंपनी हे ऑफीस आहे, शनिवारी रात्री ७ते ८ वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी आलेल्या ६ ते ७ हल्लेखोरांनी त्यांच्या कार्यालयावर दगडफेक

▶▶ पान २ वर

## परळीत महायुतीला एकहाती सत्ता

# परळी नगरपरिषद निवडणुकीत ५ दिग्गज मुस्लिम नेत्यांचा पराभव

## खान, पठाण,कुरेशी, मिस्किन,शेख पराभूत !

परळी (दिव्य न्युज):- परळी नगरपरिषदेची नुकतीच पार पडलेली निवडणूक आणि २१ डिसेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालांनी शहरातील राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले आहे. यावेळी परळी नगरपरिषदेत महायुतीने एकहाती सत्ता मिळवली असून आमदार धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली मोठा विजय नोंदविण्यात आला आहे.







मात्र या निवडणुकीतील सर्वात चर्चेचा आणि धक्कादायक मुद्दा म्हणजे परळी शहरातील पाच दिग्गज मुस्लिम नेत्यांचा झालेला पराभव. या पराभूत नेत्यांमध्ये एक माजी नगराध्यक्ष, दोन माजी उपनगराध्यक्ष आणि दोन माजी सभापतींचा समावेश असून, शहरातील राजकीय वर्तुळात या निकालाने खळबळ उडवून दिली आहे.प्रभाग क्रमांक ३ मधून माजी उपनगराध्यक्ष आयुब पठाण यांचा पराभव झाला असून त्यांच्या जागी एमआयएमच्या आयेशा मोहसीन शेख यांनी विजय मिळविला आहे.प्रभाग क्रमांक ९ मधून माजी उपनगराध्यक्ष शकीलभाई कुरेशी यांना पराभवाचा सामना करावा लागला असून अपक्ष उमेदवार इस्माईल पटेल यांनी येथे बाजी मारली आहे.प्रभाग क्रमांक १५ मधून माजी स्वच्छता सभापती अन्वर मिस्कीन यांचा पराभव झाला असून अपक्ष उमेदवार फर्जाना सादिक सय्यद यांनी विजय संपादन केला आहे.प्रभाग क्रमांक १६ मधून माजी नगराध्यक्ष जाबीर खान पठाण यांचे पुतणे तखी खान यांचा पराभव झाला असून राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नितीन बागवली विजयी झाले आहेत.प्रभाग क्रमांक १७ मधून माजी सभापती शेख शरीफ यांचा पराभव झाला असून राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे अब्दुल रहमान उर्फ हाजी बाबू यांनी विजय मिळविला आहे.

या पाच पराभूत उमेदवारांपैकी चार उमेदवार हे राष्ट्रवादी (अजित पवार गट, धनंजय मुंडे गट) चे होते. त्यांच्या पराभवानंतर दोन जागांवर अपक्ष उमेदवार, एका जागेवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि एका जागेवर एमआयएमने विजय मिळविल्याने शहरातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.या पाच दिग्गज नेत्यांच्या पराभवानंतर परळी शहरात दबक्या आवाजात एकच चर्चा रंगू लागली आहे,या पराभवामागे नेमके कोणाचा हात आहे? आणि या निकालानंतर परळीच्या राजकारणातील जुनी समीकरणे बदलणार का, असा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

# अलखैर पतसंस्थेस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली सदिच्छा भेट

## पतसंस्थेचे कामकाज पाहून सहकारमंत्री भारावले आणि केला चेअरमन यांचा सत्कार

अंबाजोगाई(दिव्य न्युज):- अंबाजोगाई तालुक्यातील हजारो उपेक्षित, गरीब व गरजु व्यक्तींना स्वावलंबी बनविणार्या अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेने सर्व विक्रम मोडीत काढत माणुसकी म्हणून प्रत्येकाला मदतीचा हात व सहकार्य केलेले आहे. अलखैर पतसंस्था ही महाराष्ट्रात इतर बँका व पतसंस्थांसमोर आदर्श म्हणून उभी टाकली आहे. या पतसंस्थेची माहिती जेव्हा सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील यांना काळाली त्यांनी तात्काळ पतसंस्थेला भेट देण्याचे निश्चित केले. आणि त्यानुसार गुरुवार दि. २५ डिसेंबर रोजी अंबाजोगाई येथे अलखैर पतसंस्थेच्या मुख्यालयाला भेट दिली व कामकाज जाणून घेतले. कामकाज जाणून घेतल्यानंतर सहकारमंत्री भारावून गेले आणि चेअरमन असलेले शेख उमर फारुक यांचा सत्कार केला.



अंबाजोगाई तालुक्यात अलखैर नागरी सहकारी पतसंस्था ही नावारुपला आलेली आहे. या पतसंस्थेने सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबवून अनेकांना प्रवाहात सामील करुन घेतले आहे. समाजामध्ये वेगवेगळे घटक आहेत. ज्यांच्याकडे पत आणि प्रतिष्ठा आहे त्यांना सर्व बँक व पतसंस्था मदतीचा हात देत असतात परंतु ज्यांच्याकडे काहीच नाही केवळ इच्छाशक्ती आहे अशा व्यक्तींना बँक मदत करत नाही व सहकार्य करत नाही. अशांना मदतीचे काम अलखैर पतसंस्थेने केले आहे. कारण अर्थ पुरवठा कितीही केला तर त्यांच्याकडे कौशल्य नाही किंवा काम करण्याची तयारी नाही त्यांना अर्थसहय्य करुन काही उपयोग नाही म्हणून संस्थेने जिगरवाल्या व्यक्तींना अर्थ सहाय्य करण्याचे काम केले आणि त्यांना उभे करण्याचे काम केले. ही पतसंस्था नव्हे तर अनेकांच्या उत्कर्षाचा मार्ग बनलेली आहे. अत्यल्प सेवा शुल्क आणि कसलेही अतिरिक्त छुपे कर न घेणारी ही पतसंस्था आहे. या पतसंस्थेची माहिती जेव्हा सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील यांना कळाली तेव्हा तात्काळ त्यांनी पतसंस्थेला भेट देण्याचे निश्चित केले तात्काळ पतसंस्थेला भेट देवून पतसंस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली त्यावर सहकारमंत्री आश्चर्यचकित झाले आणि अशा संस्था समाजात असणे गरजेचे आहे आणि अशा संस्थांमुळेच छोटा वर्ग आज मोठी प्रगती करत असल्याची भावना व्यक्त केली. प्रारंभी ना.बाबासाहेब पाटील यांचा सत्कार चेअरमन शेख उमर फारुक, व्यवस्थापक सय्यद रऊफ, व इतरांनी केला. या प्रसंगी माजी आ.संजय दौंड, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, सहाय्यक प्रशासन बीड चे सहायक निबंधक अशोक कदम, माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, अलखैर पतसंस्थेचे मार्गदर्शक तथा माजी उपनगराध्यक्ष शेख रहीमभाई, नुर पटेल, निबंधक कार्यालयाचे सहकार अधिकारी संतोष भंडारी, व्ही. मोरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कामकाजाने भारावलेले सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, खर्या अर्थाने तुम्ही सत्काराचे हक्कदार आहात. त्यामुळे तुमचा सन्मान होण्याची गरज असल्याचे सांगत स्वतः ना.पाटील यांनी चेअरमन शेख उमर फारुक यांचा सत्कार केला.

## आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश,डीपीआरसाठी थेट आदेश

# पाटोदा-जामखेड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला केंद्रीय स्तरावर गती

पाटोदा(दिव्य न्युज):- पाटोदा ते जामखेड दरम्यानच्या एनएच-५४८ऊ राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत आमदार सुरेश धस यांनी ९ डिसेंबर रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लेखी मागणी केली होती. या मागणीनंतर अवघ्या काही दिवसांत केंद्र शासन स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून, सदरील रस्त्याच्या उर्वरित अपूर्ण टप्प्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावरील काम लवकर सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे.

या संदर्भात रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे सल्लागार (तांत्रिक) बालासाहेब ठेंग यांनी २५ डिसेंबर रोजी अधिकृत पत्राद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. या पत्रात एनएच-५४८ऊ अहमदपूर-अंबाजोगाई-मांजरसुभा-पाटोदा-जामखेड या राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा (जि. बीड) ते जामखेड (सुमारे ३० कि.मी.) हा भाग अद्याप अपूर्ण असून, तो बीड जिल्ह्यात अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पत्रात नमूद केल्यानुसार, या रस्त्याच्या दयनीय स्थितीमुळे सामान्य नागरिक, प्रवासी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांनी उर्वरित अपूर्ण लांबीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची मागणी केली होती.या मागणीच्या अनुषंगाने सल्लागार (तांत्रिक) बालासाहेब ठेंग यांनी मंत्रालयाच्या वतीने प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी मुंबई तसेच मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), सार्वजनिक बांधकाम विभाग यांना थेट कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. विशेषतः मंत्रालयाच्या (चेठढक) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक ती पुढील प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या पत्राची माहिती आमदार सुरेश धस यांनाही देण्यात आली असून, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय महामार्ग मंडळाचे अधीक्षक अभियंता यांनाही अवगत करण्यात आली आहे. यामुळे हा विषय आता केवळ मागणीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रशासकीय कार्यवाहीच्या टप्प्यात पोहोचल्याचे स्पष्ट होत आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करण्यात आलेल्या मागणीनंतर मंत्रालयाने तत्काळ दखल घेतल्याने पाटोदा-जामखेड या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. डीपीआर तयार होऊन मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष रस्त्याचे काम लवकरच सुरू होईल, अशी माहिती शासकीय कंत्राटदार विश्वनाथ हुले यांनी दिली आहे अशी आशा या भागातील नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.



पान ४ वरून

## नेकनुरमध्ये दोन

नेकनुरचे माजी जिल्हा परिषद सदस्य काळे यांचे बंधू रवी काळे व त्यांचे मित्र यांनी तू आमचे कामाचे टेंडर का भरला म्हणून लाथा बुक्क्यांनी दगडाने मारहाण केले या महाराणीचा बदला घेण्यासाठी काल दिनांक २७ रोजी शनिवारी दुपारी समोरास पुन्हा दोन गटांमध्ये तुफान राडा सुरू झाल या घटनांमध्ये नेकनूर चे माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे नेकनुरचे माजी सरपंच दादाराव काळे, रवी काळे संतोष शिंदे, काट्या, दगडानी लाठ्या बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. पुढील उपचार साठी त्यांना बीड येते रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आली आहे.तर दोन्ही गटातील काही जण जखमी झाल्यामुळे त्यांना पण बीडच्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## प्रभाग क्रं. १६च्या

फारूक पटेल यांनी प्रभागात इतर मोठ मोठी कामे आणण्यासाठी प्रयत्न करावेत. राहिला स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज हे कामे करण्यासाठी जमिलभाई सक्षम आहेत. एक चांगला आणि अभ्यासू जोडीदार फारूक पटेल यांना मिळाल्याने आता या प्रभागातील मतदारांनी विकास कामांची चिंता करू नये. जे काही प्रश्न राहिले आहेत ते सर्व प्रश्न या वर्षेभरात फारूक पटेल आणि जमीलभाई हे पूर्ण ताकदीने सोडवतील. जमिलभाई यांच्या या कामांमुळे मतदारांनी समाधान व्यक्त करत तीन वर्षापासून सोसत असलेले प्रश्न तीनच दिवसात जमीलभाई आणि फारूक पटेल यांनी काही प्रमाणात निकाली काढले आहेत. जमिलभाई यांच्या सोबतीला त्यांचे चिरंजीव शेख खलील उर्फ बब्बू यांचाही मोलाची साथ असून येणाऱ्या काही दिवसात या प्रभागाचा चेहरा मोहरा फारूक पटेल, जमीलभाई आणि बब्बू यांच्या प्रयत्नातून सुटल्याचे दिसून येईल.

## राजा हो श्रेय

बीड भाग या भागात पलीकडच्या बीड पेक्षा विकासाबाबत नेहमीच अन्याय झाला लोकसभा असो विधानसभा असो या भागातील लोकांनी एक गठ्ठा मतदान रुपी आशीर्वाद ठराविक पक्षाला दिले दोन हजार एकोणीस लां सुद्धा याच भागाच्या निर्णायक अशा मतदानामुळे आमदार संदीप क्षीरसागर विजयी झाले मात्र एक गठ्ठा मतदान देवून ही विकासा पासून कोसो दूर असलेल्या या भगातील जनता या सर्व प्रकाराला एका प्रकारे कदरली होती असे स्पष्ट दिसते

आणि म्हणून यंदा नवीनच काही तर होऊन जाऊ द्या या भूमिकेत या भागातील मतदार होता हा कोणत्याही नेत्याचा पक्षाचा पराक्रम मानताच येणार नाही तर ही जनतेच्या मनातील खदखद उफाळून आली व मतदानातून व्यक्त झाली खऱ्या अर्थाने यंदा या भागातिल जनतेने खुपच विचार पूर्वक मतदान केले नगर सेवक पदासाठी याच भागातील प्रभाग २२ मधून दोन राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रभाग २३ मधून एक राष्ट्रवादी शरद पवार तर दुसरा काँग्रेस

प्रभाग २४ मधून दोन्ही नगरसेवक राष्ट्रवादी शरद पवार

आणि विशेष म्हणजे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला मोठ्या प्रमाणात याच भागातून लीड, शहरात सर्वात जास्त लीड याच भागातून जर हा करिश्मा एखाद्या नेत्याचा असला असता किंवा व्यक्तीचा असला असता तर नगरसेवक ही निवडून यायला पाहिजे होते. मात्र तसे न होता जनतेने विचार करून अनेक पर्याय समोर ठेवून मतदान केले आणि काम करणाऱ्या जनतेत असणाऱ्या लोकांना नगरसेवक पदासाठी मतदान केले मग त्यांनी पक्ष पाहिला नाही व नगराध्यक्ष पदासाठी वेगळा विचार केला घड्याळ ला भरभरून मतदान दिलं आता यात कुठून एखाद्या नेत्याचा करिश्मा आला तसे दिसण्याचे काहीच कारण नाही

पेठ बीड भाग हा प्रत्येक निवडणुकीत निर्णायक भूमिका पार पाडणारा भाग आहे लोकसभा विधानसभा नगरपालिका या तिन्ही निवडणुका मध्ये या भागाने काय किमया साधली हे विश्लेषण सांगायला कोणत्याही राजकीय जाणकाराची आवश्यकता भासणार नाही कारण या भागात अनेक मूलभूत प्रश्न अतिशय शुल्लक प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे गेल्या अनेक वर्षांपासून या भागाने खूप काही सोसलं आहे

मूलभूत सुविधा साठी देखील मोठा संघर्ष या ठिकाणच्या जनतेने केला आहे पाणी ,रस्ते ,नाली,स्वच्छ्ता , वीज या कामाचा मोठा अनुशेष या परिसरात आहे आणि तीच खदखद या निवणुकीत बाहेर आली की लगेच श्रेय घेणाऱ्यांनी स्वतःच्या हातून स्वतःची पाठ थोपटून घेण्याचे पराक्रम सुरू केले असे काहीच नाही जर खऱ्या अर्थाने असे झाले असते तर सुरवातीच्या फेरी पासून घड्याळाच्या उमेदवाराला मिळालेली मते पहा

सुरवातीच्या फेरी पासूनच प्रभाग एक ते बारा पर्यंत प्रेमलता पारवे या कडवी झुंज देताना पाहायला मिळाल्या नसत्या मग या भागात का श्रेय घेणाऱ्यांना आपला करिश्मा दाखवता का आला नाही की फक्त मुस्लिम बहुल भाग पुरताच यांचा करिश्मा मर्यादित होता हा संशोधनाचा विषय आहे

मुस्लिम बहुल भागाने यंदा विकासाच्या मुद्द्याला ग्राह्य धरून परिवर्तनाच्या दिशेने पाऊल टाकले दर वेळी तेच तेच देवून ही आपला भाग विकासापासून कोसो दूर आहे म्हणून विकास होईल या आशेने लोकांनी मते दिली मात्र त्यांच्या मतांवर दुसऱ्यांचीच दुकानदारी जोरात सुरू झाली म्हणून मोठ्या प्रमाणात या भगातिल जनतेत खदखद व्यक्त केली जात आहे त्यांची अनेक कारणे आहेत तसे दुसरे पक्ष मुस्लिम मतदारांना आपल्या पर्यंत आकर्षित करण्यात कमी पडले.

अनेकांना अती आत्मविश्वास नडला.आणि मुजीब भाई यांचा चेहरा या पेठ बीड भागात प्रभावी ठरला म्हणून प्रेमलता पारवे यांचा दणदणीत विजय झाला याचे श्रेय जाते ते फक्त या भागातील सर्वसामान्य नागरिक , सामाजिक कार्यकर्ते,युवक,कष्टकरी , कामगार वर्ग रिक्षा चालक ,हॉटेल चालक ज्यांनी ही निवडणुक हातात घेवून मुजीब भाई यांच्या सासू साठी स्वतःला झोकून देत परिश्रम करून मते मागितली मते वळवली स्वखर्चाने मुजीब भाई यांच्या साठी आप आपले उद्योग व्यापार बंद ठेवून धावपळ केली

आणि ऐन वेळेस निवडणुकीच्या या घडीत योग्य मतदान कसे करावे हे पटवून दिले यात श्रेय घेणाऱ्यांनी जनाची नाही तरी मनाची तरी लाज बाळगून श्रेय घ्यावे अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकात रंगली आहे आणि एका प्रकारे संताप ही व्यक्त केला जात आहे हा विजय फक्त आणि फक्त समाज एकजुटीचा असून आता पाठ थोपटून घेण्याचे उद्योग बंद करावे अशी अपेक्षा देखील व्यक्त करण्यात येत आहे

## सुभाष हुंबरे

केली. यामध्ये झाले आहे. या हल्लयात सुभाष हुंबरे हे काचा फुटून मोठ्या प्रमाणावर नुकसान देखील जखमी झाले असून त्यांच्यावर सदरील घटनेनंतर हुंबरे स्वतः रक्तबंबाळ जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अवस्थेत हल्लेखोरांकडील एक रिव्हॉल्वर हिसकावून घेत थेट शिवाजी नगर पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. त्यांनी स्वतः पोलिसांना ही माहिती दिली आहे. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

## नेकनूरजवळ

घटनास्थळी नागरिकांनी तातडीने मदतकार्य करत जखमीला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविले. मयत किशोर निर्मळ यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नेकनूर येथील कुटीर रुग्णालयात पाठविण्यात आला असून जखमीला जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान आज नेकनुर चा आठवडी बाजार असल्याने अपघातानंतर काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच नेकनूर येथील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून अपघाताचे नेमके कारण तपासले जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी या मार्गावर वेगमर्यादा आणि वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजना कडक करण्याची मागणी केली आहे.

पान ४ वरून

## तक्रारींनंतर खराब

संबंधित ज्वारीचे वितरण तूर्तास स्थगित केले आहे. मात्र, अशी निकृष्ट व खाण्यायोग्य नसलेली ज्वारी पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांवर आणि यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते ललित आब्बड यांनी उपस्थित केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून बीड तालुक्यातील रेशनधारकांना अत्यंत निकृष्ट दर्जाची, दुर्गंधीयुक्त व खाण्यायोग्य नसलेली ज्वारी वितरित केली जात होती. या ज्वारीचा वापर न होऊ शकल्याने अनेक गरीब कुटुंबांना ती ज्वारी घरातच पडून ठेवावी लागली. ही बाब गंभीर असतानाही संबंधित रेशन दुकानदार, पुरवठादार तसेच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तक्रारी दिल्यानंतर नंतर जिल्हा प्रशासनाने अखेर दखल घेत जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना तातडीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले असून, सदर ज्वारीचे वितरण तात्पुरते बंद करण्यात आले आहे. मात्र, ही केवळ तात्पुरती मलमपट्टी असून दोषींवर ठोस कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत ललित आब्बड यांनी पत्रकातून व्यक्त केले आहे.महत्त्वाचे म्हणजे, जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी या ज्वारीचा दर्जा उत्कृष्ट असल्याचा अहवाल सादर केला होता. त्याच अहवालाच्या आधारे जिल्हा पुरवठा कार्यालयाने १० ऑक्टोबर, २२ नोव्हेंबर व १९ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यासाठी ज्वारीचे नियतन मंजूर केले होते. प्रत्यक्षात मात्र ही ज्वारी खाण्यास अयोग्य असल्याचे स्पष्ट झाल्याने या अहवालांची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.जर ज्वारी खरोखरच उत्कृष्ट दर्जाची होती, तर नागरिकांच्या ताटात ती पोहोचण्यापूर्वीच निकृष्ट कशी ठरली? असा सवाल उपस्थित करत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून पुरवठादार, संबंधित अधिकारी तसेच अहवाल देणाऱ्या यंत्रणेवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी ललित आब्बड यांनी केली आहे.

## जिंतूर येथे भारतीय स्त्री

प्राध्यापक मदन जाधव यांनी केले. यावेळी मान्यवरांचा परिचय अनिल नागरे यांनी करून दिला. क्रांतीज्योती या कवितासंग्रहाबद्दल मनोहर राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. या कवितासंग्रहात जिंतूर मधील तीन कवी मित्र सुशील कुमार कुबडे, कपिल कनकुटे व मनोहर राऊत यांच्या अनुक्रमे क्रांतीपर्व, धन्य ते साऊजोती व क्रांतीरत्न या आशयघन कविता समाविष्ट आहेत. या कवितांचे वाचन कुबडे यांनी केले.आभार प्रदर्शन प्रदर्शन सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश सानप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निशांत भडगळ, अक्षय गायकवाड, ओंकार काळे ,सत्यम काळे यांनी परिश्रम घेतले होते

## लातूर-कल्याण

बीड, केज आणि अंबाजोगाई या भागातून जाणाऱ्या मार्गाला वळण देऊन तो दुसरीकडून नेण्याचा प्रयत्न झाल्यास बीडच्या विकासाला खीळ बसेल, असे मत व्यक्त होत आहे.

यावर प्रतिक्रिया देताना सय्यद जाहेद जमील म्हणाले की, बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गाचा मार्ग बदलण्याची मागणी करून मंत्री प्रताप सरनाईक बीडच्या जनतेवर अन्याय करत आहेत. मूळ आराखड्यानुसार हा मार्ग बीड जिल्ह्यातूनच गेला पाहिजे. जर राजकीय वजन वापरून हा मार्ग बदलण्याचा प्रयत्न झाला, तर आम्ही ते खपवून घेणार नाही. या अन्यायाविरोधात आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू.सध्या बीड जिल्ह्यातील विविध स्तरांतून मंत्री प्रताप सरनाईक यांच्या या भूमिकेचा निषेध केला जात असून, हा मार्ग मूळ आराखड्यानुसारच ठेवावा, अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे.

लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचे आवाहन

बीड जिल्ह्याच्या विकासाला खीळ बसवणारा हा निर्णय हाणून पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नेत्यांनी गट-तट विसरून एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे. बीडचे पालकमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, तसेच जिल्ह्यातील सर्व खासदार आणि आमदारांनी एकत्र येऊन सरकारकडे बीडची बाजू भक्कमपणे मांडावी आणि हा मार्ग मूळ आराखड्यानुसारच ठेवावा, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे.

दिव्य वार्ता



# नवनिर्वाचितांची बॅनरबाजी बोकाळली!

# बीडकरांच्या जीवाशी खेळ !

## निवडणूक जिंकली म्हणजे नियम पायदळी तुडवायचे का?

### वाहतुकीला अडथळा; नगरपरिषदेचे दुर्लक्ष- डॉ. गणेश ढवळे

बीड , (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद निवडणुकीत जनतेने मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच कायदे व नियमांना हरताळ फासल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सर्वपक्षीय विजयी उमेदवारांनी सत्तेची धुंदी चढताच कायद्याच्या चौकटीला तिलांजली देत विजयानंतर शहरभर अनधिकृत बॅनर व होर्डिंग लावून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिला जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला आहे.बीड शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या सुभाष रोड परिसरात विजेच्या खांबांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी तर बॅनर रस्त्यावर झुकल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

निवडणुकीपूर्वी आचारसंहिता व नियमांचे पाठ वाचवणारी नगरपरिषद, निवडणूक संपताच मात्र या अनधिकृत बॅनरबाजीबाबत पूर्णपणे डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे. शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण व नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या नगरपरिषदेची भूमिका त्यामुळे संशयास्पद ठरत आहे.अनधिकृत बॅनरबाजीबाबत नगरपरिषदेकडे विचारणा केली असता, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांनी सर्व अनधिकृत बॅनरवर कारवाई केली जाईल असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही.

यामुळे शहराची जबाबदारी सांभाळणाऱ्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा सवाल पुन्हा एकदा डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.दरम्यान, उद्या दि.



२९ डिसेंबर (सोमवार) रोजी अनधिकृत बॅनरबाजी करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी नगरपरिषद बीड कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



सिल्लोड : नगर परिषदच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३(अ) मध्ये आसिफ बागवान यांचा ऐतिहासिक मतांनी विजयी झाल्याने व सिल्लोड नगर परिषदेच्या नगरसेवक पदी निवड झाल्यावर आसिफ बागवान यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना जय किसान जिन्दालसेठ अनुप जिन्दालसेठ अधिक दिस्त आहे. ( छायाचित्र :- शेख अफसर सिल्लोड)



सिल्लोडः शहरातील प्रशाद नगर येथील पठाण एजाज़ खान शेर खान यांचे दोघे चिरंजीव पठाण सैफ अबरार व पठाण कैफ अहरार तसेच नगरसेवक पठाण रईस खान मुजावर यांचे पुतण्याचे( दावते- वलीमाचा कार्यक्रम ) गुरुवारी आयोजित करण्यात आले होते. त्या निमित्ताने पठाण सैफ अबरार व पठाण कैफ अहरारच्या गळ्यात शाल टाकून सत्कार करताना माजी नगरसेवक हाजी मतीन देशमुख, नगरसेवक जुम्मा कोतवाल, पठाण एजाज़ खान ,नगरसेवक पठाण रईस खान, अधिक दिस्त आहे. (छायाचित्र : - शेख अफसर सिल्लोड)

## दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

केज (दिव्य न्युज):- केज शहरातील फुले नगर भागातील नयुम सुलेमान शेख (वय ४०) व त्यांचा मित्र सोहील अहेमद फारूकी हे दोघे २६ डिसेंबर रोजी रात्री ७.४५ वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून स्कुटीवर (एम. एच. ४४ एएफ १४७३) बसून अंबाजोगाई रोडवरील मित्राला भेटण्यास निघाले होते. थोरात हॉस्पिटलच्या पुढे १०० फूट अंतरावर गेले असता अंबाजोगाई रोडने भरधाव वेगात निलेल्या अज्ञात दुचाकीने त्यांच्या स्कुटीला अचानक पाठीमागून धडक दिल्याने या अपघातात नयुम शेख व सोहील फारूकी हे दोघे रस्त्यावर पडून त्यांच्या हाताला, पायाला मार लागून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्कुटीचे नुकसान झाले असून दुचाकी चालक न थांबता दुचाकी घेऊन पसार झाला. नयुम शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकीच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक त्रिंबक सोपणे करताहेत.

# मराठी पत्रकार संघ बोरीच्या अध्यक्षपदी शेख नईमोद्दीन कौसडीकर यांची बिनविरोध निवड

## कार्याध्यक्षपदी भास्करराव चौधरी तर सचिवपदी मनोज टाक यांचीही सर्वानुमते निवड

जिंतूर, (दिव्य न्युज):- अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबई संलग्न मराठी पत्रकार संघ बोरी, ता. जिंतूर येथील नूतन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. सदर निवड प्रक्रिया सर्वानुमते व बिनविरोध संपन्न झाली असून पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शेख नईमोद्दीन कौसडीकर यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्याध्यक्षपदी भास्करराव चौधरी तर सचिवपदी मनोज टाक यांचीही सर्वानुमते बिनविरोध निवड झाली आहे.

नूतन कार्यकारिणीच्या निवडीमुळे बोरी व परिसरातील पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून पत्रकार संघ अधिक सक्षमपणे कार्य करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या विविध समस्या, हक्क, संरक्षण व व्यावसायिक प्रश्नांवर ठोस भूमिका घेण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी संघाच्या तालुका उपाध्यक्षपदी अभिजीत चौधरी यांची निवड करण्यात आली. शाखा उपाध्यक्ष म्हणून गणेश ठाकूर व नदीम पठाण यांची नियुक्ती झाली असून कोषाध्यक्षपदी संतोष लहाने यांची निवड करण्यात आली आहे.

संघाच्या कार्यकारिणी सदस्यांमध्ये मुंजा कंठाळे, मारोती गायकवाड, शेख हनीफ, शेख




मोबीन, सदाशिव देशमुख, बंडू राऊत, शेख अस्लम, शिवानंद कंठाळे, अशोक उकंडे यांचा समावेश आहे.तसेच संघाच्या कार्यासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी सल्लागार म्हणून दीपक नाना राजूरकर, इंजि. नारायणराव चौधरी, आनंदकुमार मुरक्या, तुकाराम सर्जे, मोया शेख, शम्मू पटेल यांची निवड करण्यात आली आहे. मार्गदर्शक म्हणून गजानन चौधरी व रामा ढाकरगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सदर निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी निर्वाचन अधिकारी म्हणून तालुका मराठी पत्रकार संघाचे मार्गदर्शक एम. ए. माजिद संघाचे तालुकाध्यक्ष बालाजीराव शिंदे, माजी तालुका अध्यक्ष शेख शकील बोरीचे सल्लागार व मार्गदर्शक श्री दीपक नाना राजूरकर तसेच माजी तालुका अध्यक्ष श्री गजानन चौधरी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

अध्यक्ष शेख नईमोद्दीन कौसडीकर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, संघाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाबद्दल मी सर्व पत्रकार बांधवांचा मनःपूर्वक आभारी आहे. बोरी व परिसरातील पत्रकारांचे प्रश्न, सुरक्षितता, हक्क आणि सन्मानासाठी संघटन अधिक मजबूत करून काम केले जाईल. सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व ज्येष्ठ मार्गदर्शकांना सोबत घेऊन संघाचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अलखैर मल्टीपर्पज फाउंडेशन आयोजित करियर गायडन्स कार्यक्रम संपन्न

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, वैद्यकीय क्षेत्रात अग्रेसरपणे कार्य करणारी अलखैर फाउंडेशन यांनी २५ डिसेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी कोणकोणत्या क्षेत्रामध्ये शासकीय कर्मचारी होण्याची संधी मिळू शकते यासाठी सर सय्यद अहेमद खान शाळेमध्ये करिअर गायडन्स आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अब्दुल वकील सर होते. सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुलाम साकेब सर यांनी केले. आतापर्यंत अलखैर फाउंडेशन कडून ४० विद्यार्थी शासकीय कर्मचारी झाले आहे व आयटी क्षेत्रामध्ये ८० च्या वरीपेक्षा विद्यार्थी नोकरीवर रुजू झाले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात अलखैरने विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून कोचिंग देऊन स्कॉलरशिप देऊन सहकार्य करीत आहे या उद्देशाने करिअर गायडन्स कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई हायकोर्ट माजी उपमुख्य अनुवादक एडवोकेट शेख मोहम्मद उमर साहेब उपस्थित होते त्यांच्यासोबत एडवोकेट शौकत साहेब, माजी रजिस्टर सेशन कोर्ट व त्यांची टीम उपस्थित होती. सोबतच शेख तबरेज यांनी फार्मसी क्षेत्रामध्ये डिप्लोमा व डिग्री केल्यास कोणत्या कंपन्यांमध्ये किती पॅकेजवर जॉब मिळू शकते विद्यार्थ्यांना समजावून सांगितले यामध्ये या कार्यक्रमांमध्ये २०० विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदविला करिअर गायडन्स कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अलखैर टीमचे सदस्य यांनी आपले मेहनतीने व सहकार्य नोंदविले त्यामध्ये मोलाचा वाटा देणारे शेख रफत सर, सय्यद अजीम सर, अजहर इनामदार सर , डॉ इम्रान खान सर, डॉ शकील सर, सय्यद आतिफ सर, साखेब सर, रजी सर, आमिर खान सर, मोहसीन करीम, शहेबाज पठाण, डॉक्टर आकेब होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आमीर खान सर यांनी केले व आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व प्रमुख पाहुण्यांचे आभार अल खैर फाऊंडेशन चे अध्यक्ष अझहर इनामदार सर यांनी केले.




## डॉ.सारिकाताई क्षीरसागर बीडमध्ये फिल्डवर

# प्रभागातील स्वच्छतेसह इतर कामांना प्रत्यक्ष सुरुवात





बीड , (दिव्य न्युज):- शहरातील प्रभाग १५ मधील स्वच्छता व इतर कामांना प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. भाजपच्या नगरसेविका तथा गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या शहरात फिल्डवर दिसून आल्या. त्यांनी इतरही सहकारी नगरसेवकांना कामाला लावले आहे.डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, प्रभागातील नागरिकांनी दिलेला विश्वास हेच आपले कवचकुंडल असून, त्या विश्वासाच्या बळावर प्रभागाच्या विकासासाठी सातत्याने काम केले जाईल. यासोबतच बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपचे सर्व नगरसेवक लोकांमध्ये राहून, थेट संपर्कातून काम करतील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शहरातील बदलत्या परिस्थितीनुसार नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, तक्रारी व अपेक्षांचा पाठपुरावा करून त्या पूर्ण होईपर्यंत संबंधित नगरसेवक व कार्यकर्ता कटिबद्ध राहील, असेही त्यांनी म्हटले. बीड हे आपल्या सर्वांचे असून, शहरावर प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सहकारी नगरसेवक सनी माने, नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातील कर्मचारी तसेच प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## मुख्यमंत्री ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत सरपंच सौ.प्रियंकाताई खेडकर यांचे विकासात्मक कार्य

चकलांबा, (दिव्य न्युज):- ग्रामीण भागात सक्षम नेतृत्वाची गरज प्रकर्षाने जाणवते अशा वेळी सरपंच प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांचे कार्य प्रेरणादायी ठरते.त्यांनी आपल्या कार्यकाळात गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जे प्रयत्न केले ते खरोखर उल्लेखनीय आहे.चकलांबा ग्रामसेवक टी.एस.शेंडेकर यांचे प्रशासकीय कौशल्य व सरपंच सौ.प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांचे नेतृत्व व कार्य तत्परता यामुळे चकलांबा ग्रामपंचायत मध्ये मुख्यमंत्री ग्राम स्वराज्य अभियाना अंतर्गत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊन गावांमध्ये सर्वांगीण विकासाला चालना मिळाल्याचे दिसून येत आहे.

गावाच्या मूलभूत गरजा ओळखून त्यावर ठोस उपाययोजना करणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे पाणीपुरवठा स्वच्छता रस्ते वीज आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रामध्ये त्यांनी विशेष लक्ष दिलेले आहे. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून त्यांचा लाभ थेट सामान्य नागरिकापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केलेले आहे.चकलांबा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेसाठी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी ८७ बेंचेस तसेच शाळेला २५ खोल्यांना लाईट फिटिंग व फॅन हे त्यांच्या वित्त आयोगातून





त्यांनी प्रयत्न करून शाळेला दिलेले आहे. तसेच त्यांनी सोनवणे वस्ती येथे विशेष प्रयत्नातून अंगणवाडी साठी बांधकाम केले . ग्रामपंचायतच्या ग्रामनिधीतून गावामध्ये बसस्टँड वर सीसीटीव्ही कॅमेरे, सावतामाळी चौक ते बस स्टँड रस्ता,बस स्टँड परिसर आणि गावामध्ये सिमेंट रस्ते तसेच सिमेंट ब्लॉकचे रस्ते गावामध्ये चांगल्या दर्जाचे झाल्याचे दिसून येत आहेत. तसेच, स्पर्धा परीक्षेच्या मुलां-मुलींसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका सीसी टिव्हीच्या निगराणीखाली सुसज्ज अशी सौ.सरपंच प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी वित्त आयोगातून चकलांबा येथे सुरू केली आहे.मुख्यमंत्री ग्राम स्वराज्य अभियानामुळे शासकीय योजना गावाच्या घरो-घरी पोहोचवून स्वयंपूर्ण स्वच्छ समृद्ध आणि सक्षम गाव घडवण्यास मोठी मदत होत असताना दिसून येत आहे. पारदर्शक कारभार लोकांचे थेट संवाद प्रत्येक घटकाचे म्हणणे एकूण घेणे आणि समस्या सोडवण्यासाठी तात्काळ निर्णय घेणे ही त्यांचे नेतृत्व शैलीचे ठळक वैशिष्ट्ये आहेत.त्यामुळे ग्रामस्थांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाने आदर निर्माण झाला आहे.सरपंच सौ प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर या केवळ पदावरून नव्हे तर आपल्या कार्यातून नेतृत्व सिद्ध करणाऱ्या गावाच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत राहणाऱ्या आणि बदल घडवून आणणाऱ्या सरपंच ताई आहेत.त्यांचे कार्य ग्रामीण विकासासाठी एक आदर्श ठरत आहे. कामातून नेतृत्व सिद्ध करणाऱ्या बदल घडवून आणणाऱ्या आणि गावाच्या प्रगतीसाठी सदैव तत्पर असलेल्या सरपंच म्हणून त्यांची आज चकलांबा सर्कल तसेच गेवराई तालुक्यामध्ये ओळख आहे.

# तक्रारींनतर खराब ज्वारीच्या वाटपाला स्थगिती

## वादग्रस्त जिल्हा पुरवठा अधिकारी स्वामींनी निकृष्ट दर्जाच्या ज्वारीचे वाटप तत्काळ थांबविले !

### प्रशासनाने कागदी घोडे नाचून नाचू नये. मात्र जबाबदारांवर गुन्हे दाखल कधी?

**बीड, (दिव्य न्युज):- शिवकुमार स्वामी हे जिल्हा प्रशासनातील अत्यंत वादग्रस्त अधिकारी असल्याचा आरोप सर्वसामान्य जनतेकडून सतत होत आला आहे. पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा येथील खडी क्रेशरबद्दल तक्रारींचा ढीग असताना या खडी केशरला अखेर परवानगी देण्यात आली आणि त्या परवानगीसाठी शेवटची सही ही स्वामी यांचीच असल्याचे बोलले जात आहे. हे तेच स्वामी आहेत आता ज्यांच्याकडे जिल्हा पुरवठा विभागाची जबाबदारी जिल्हा प्रशासनाने सोपविली आहे. आता या जिल्हा पुरवठा विभागाचा कारभार शिवकुमार स्वामी किती पारदर्शकपणे सांभाळतात हे देव जाणे, अशाही प्रतिक्रिया आता व्यक्त होऊ लागल्या आहेत. काही वादग्रस्त आणि अत्यंत भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे सर्वसामान्य जनतेचा जिल्हा प्रशासनावरील विश्वास उडाला असून जिल्हा प्रशासनाची इज्जत वेशीला टांगली गेल्याचे बोलले जात आहे.**

एकूणच जिल्हा पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानातून सर्वसामान्य जनतेला अत्यंत निकृष्ट दर्जाच्या ज्वारीचे वाटप केले जात होते. याबाबत दैनिक दिव्य वार्ताने वृत्त प्रकाशित करताच जिल्हा प्रशासनाने निकृष्ट दर्जाच्या ज्वारीचे वाटप तात्काळ थांबविले आहे, अशी माहिती तक्रारदार समाजसेवक ललित अब्बड यांनी दिली.बीड तालुक्यात शिधापत्रिका धारकांना वितरित करण्यात येणाऱ्या भरडधान्य ज्वारीच्या गुणवत्तेबाबत मोठा प्रकार उघडकीस आला असून, नागरिकांनी व अरिहंत नेहरू युवा चे ललित आब्बडच्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाने

▶▶ पान २ वर



### सर्वतहसीलदारांना तातडीने कार्यवाही करण्याचे दिले आदेश

गेल्या काही महिन्यांपासून बीड तालुक्यातील रेशनधारकांना अत्यंत निकृष्ट दर्जाची दुर्गंधीयुक्त व खाण्यायोग्य नसलेली ज्वारी वितरित केली जात होती. निकृष्ट दर्जाच्या ज्वारीमुळे सुदैवाने कोणाच्याही जीवितेला धोका झाला नाही किंवा कोणी आजारी पहले नाही. परंतु, ही अत्यंत गंभीर बाब असताना संबंधित रेशन दुकानदार, पुरवठादार तसेच पुरवठा विभागातील अधिका-यानी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे. तक्रारी दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने अखेर दखल चैत जिल्हयातील सर्व तहसीलदारांना तातडीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले असून, सदर ज्वारीचे वितरण तात्पुरते बंद करण्यात आले आहे. मात्र, ही केवळ तात्पुरती मलमपट्टी असून दोषींवर ठोस कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत ललित अब्बड यांनी व्यक्त केले

### वादग्रस्त आणि काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वच्छ प्रतिमेला तडे !!

बीड जिल्ह्याला जिल्हाधिकारी म्हणून लाभले, जॉन्सन यांच्या कार्यपद्धतीवर सर्वसामान्य माणूस समाधानी असल्याचे एकीकडे सांगितले जात असले तरी त्यांच्याच प्रशासनातील काही अष्ट आणि अत्यंत वादग्रस्त अधिकाऱ्यामुळे जिल्हाधिका-यांच्या स्वच्छ प्रतिमा तहे जात असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे त्यांच्याच नाकाखाली आणि त्यांची नजर चुकवून जर कोणी गैर उद्योग करीत असतील तर साहजिकच प्रशासनावरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास अजिबात राहणार नाही, तेव्हा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी स्वतःची केबिन सोडून इतरही विभागांमध्ये काय बालले आहे? हे पाहणे महत्वाचे ठरते. अशाही भावना सर्वसामान्य जनतेमधून व्यक्त केल्या जात आहेत.

# जिंतूर येथे भारतीय स्त्री मुक्ती दिनानिमित्त डॉ.आंबेडकर वाचनालयात व्याख्यान व कविता संग्रह प्रकाशन सोहळा



जिंतूर, (दिव्य न्युज ):- जिंतुर येथे भारतीय स्त्रीमुक्ती दिनानिमित्त सत्यशोधक विद्यार्थी संघटनेच्या वतीने दिनांक २५ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या व्याख्यान सोहळ्यात प्रमुख व्याख्यात्या प्रा.डॉ.मनीषा पाटील यांनी भारतीय स्त्री मुक्ती विषयक विचार मांडले आजची स्त्री कुठेही कमी नाही हे सांगून समाज सुधारणा चळवळीचे महत्त्व विशद केले.प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सदानंद पुंडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीयांना मुक्तीकडे वाटचाल करावी लागेल असे मत मांडले. बारकोजी मोरे यांनी मनुस्मृति दहन व स्त्री मुक्ती विषयक विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ड. सुनील बुधवंत यांनी समता विषयक विचारांची विस्तृत मांडणी करुन अध्यक्षीय समारोप केला.

यावेळी चित्रापगारे यांनी संपादित केलेला प्रतिनिधिक 'क्रांतीज्योती' कविता संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राध्यापक डॉक्टर मनीषा पाटील, प्राध्यापक सदानंद पुंडगे, डॉ.मनेष खटावे, बारकोजी मोरे , प्रस्धिद विधीतज्ञ सुनील बुधवंत ,शितल कुबडे, जयश्री काळे, दै.दिव्य वार्ता चे प्रतिनिधी सालेह चाऊस ,सुनिता पाटील श्रीमती दांडगे,प्राध्यापक सागर पुंडगे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील कुमार कुबडे तर प्रास्ताविक

▶▶ पान २ वर



बीड : दिनांक २२/१२/२०२५ रोजी जि.प.प्राशा ऊर्दु कन्या नेकनुर येथे SQAFF शाळा गुणवत्ता व आश्वासन आराखडा पुनर्मुल्यांकनात सदर शाळा ४ स्टार रेटींग प्राप्त झाल्यामुळे नेकनूर ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठीत नागरीकांच्या वतीने मुख्याध्यापिका निसफत बेगम व सर्व स्टाफचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शेख अर्शद उर्फ राजा भैय्या,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रहीम साहब,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रिजवान. व,शा.व्य.सदस्य खाजापाशा,पालक शेख साबेर,कमेटी सदस्य बाबर खतीब व केंद्र क म नेकनुरचे केंद्र प्रमुख ईद्रीस जाफर सर व या शाळचा सर्व स्टाफ उपस्थित होता.





बीड : नुकत्याच झालेल्या माजलगाव नगर परिषदेच्या निवडणूकीत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सहालभैय्या चाऊस यांच्या सुनेने घवघवीत यश प्राप्त केले तसेच सहालभैय्या हे स्वतः प्रभागातून नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. या निमित्त माजलगाव येथे जावून महाराष्ट्र मुस्लिम पत्रकार फाउंडेशनच्या वतीने सहालभैय्या यांना हार,शाल,पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करत शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संस्थापक प्रदेशाध्यक्ष मोहंमद अबुबकर,प्रदेश सचिव समीर सरकार, नगरसेवक जैतुल्ला खान, तलहा चाऊस सह आदी.

# लातूर-कल्याण महामार्गाचा मार्ग बदलल्यास रस्त्यावर उतरू-सय्यद जाहेद जमील

## मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रस्तावावर बीडमधून संताप

नेकनूर, (दिव्य न्युज):- नियोजित 'लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती महामार्गा'चा मार्ग बदलून तो धाराशिव जिल्ह्यातून नेण्याचा प्रस्ताव राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. मात्र, या प्रस्तावामुळे बीड जिल्ह्यातील रस्ता नियोजित असलेल्या भागावर अन्याय होणार असून, जर महामार्गाचा मार्ग बदलला तर बीडकरांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि रस्त्यावर उतरू, असा सज्जड इशारा हेल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष सय्यद जाहेद जमील यांनी दिला आहे.

नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात लातूर ते मुंबई हे अंतर अवघ्या ४-५ तासांत पूर्ण करण्यासाठी 'लातूर-कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग)' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर करण्यात आला होता. उपलब्ध माहितीनुसार, हा मार्ग लातूर-अंबाजोगाई-केज-आहिल्यानगर-कल्याण असा प्रस्तावित आहे. यामुळे बीड जिल्ह्याला दळणवळणाचा मोठा फायदा होणार आहे.मात्र, दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक पत्र लिहून या मार्गात बदल करण्याची मागणी केली आहे. सरनाईक यांच्या पत्रानुसार, हा मार्ग लातूरवरून कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड असा वळविल्यास याचा फायदा धाराशिव जिल्ह्याला होईल, असे नमूद केले आहे.

बीडमधून तीव्र विरोध

प्रताप सरनाईक यांच्या या निवेदनाची माहिती मिळताच बीड जिल्ह्यातून संताप व्यक्त होत आहे.

▶▶ पान २ वर

## राजकारण, शिंदे सेनेने जिंकल्या ५ जागा तर ठाकरे गटानेही उघडले खाते

# सत्तेचे समीकरण,सेनेला अच्छे दिन, सभापतीपदाच्या स्पर्धेत

बीड, (दिव्य न्युज):- नगर परिषदांच्या निवडणुकीत जिल्ह्यात शिवसेनेला अच्छे दिन आले आहेत. बीड पालिकेत शिवसेनेच्या ३ जागा निवडून आल्या आहेत, तर परळीत २ जागा सेनेला मिळाल्या आहेत. ठाकरे गटानेही बीड पालिकेत खाते उघडले आहे. आता निवडणुकीनंतर विषय समित्यांच्या सभापती निवडीत शिवसेना सभापतिपदांच्या स्पर्धेत आली आहे. बीड, परळीत मित्रपक्ष म्हणून एक सभापतिपद सेनेला मिळू शकते. दुसरीकडे बीडमध्ये





संख्याबळाची अडचण झाल्याने एकत्रित लढलेले राष्ट्रवादी शरद पवार गट व ठाकरेंची शिवसेना ज्याला पाठिंबा देईल, त्याच्याकडे उपनगराध्यक्षपदासह सभापतिपदे येतील. त्यामुळे या वाटाघाटीतही ठाकरे गटाला सभापतिपदासाठीची लॉटरी लागू शकते. नगरपालिकांच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचा प्रभाव दिसून आला. ३ नगराध्यक्षपदांसह ८० पेक्षा जास्त नगरसेवक राष्ट्रवादीचे निवडून आले. पाठोपाठ भाजपनेही २ नगराध्यक्षांसह ५४ नगरसेवक निवडून आले. शरद पवार गटानेही १ नगराध्यक्षपदासह सुमारे ३० ते ३५ नगरसेवक निवडून आणले आहेत.

### उद्धव ठाकरेंचा एकच शिलेदार, दोन्हींकडून आहेत दावेदार

बीडमध्ये ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या पत्नी मनीषा गिराम विजयी झाल्या आहेत. ठाकरे गट व शरद पवार गट एकत्रित लढले होते. पवार गटाचे १२ व ठाकरेंच्या गिराम असे १३ नगरसेवक त्यांच्याकडे आहेत. बहुमताचा जादुई आकडा नसल्याने राष्ट्रवादी अडचणीत आहे, भाजपकडून उपनगराध्यक्षपदासह विषय समित्यांवर ताबा मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी होत आहे. त्यात या १३ सदस्यांना महत्त्व आले असून, मित्रपक्ष म्हणून सभापतिपदासाठी गिराम प्रयत्न करतील.

### बीडमध्ये शिवसेनेने युतीत राहून १३ जागांवर केली बंडखोरी

बीड नगरपालिकेत शिंदेंची शिवसेना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटासोबत युतीत लढली. युतीत ४ जागा मिळाल्यानंतर शिवसेनेने १३ ठिकाणी राष्ट्रवादीच्याच विरोधात उमेदवार उभे करून बंडखोरी केली होती. बीड पालिकेत शिंदेंच्या शिवसेनेच्या ३ जागा निवडून आल्या आहेत. मागील काही वर्षांत पहिल्यांदाच सेनेला इतक्या जागा मिळाल्या आहेत. आता राष्ट्रवादीचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. अजित पवार सत्ता समीकरण जळवून विषय समित्यांवर ताबा घेण्याची रणनीती आखत आहेत. त्यामुळे मित्रपक्ष म्हणून किमान १ सभापतिपद मिळवण्याचा सेनेचा प्रयत्न आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०